# महाराष्ट्र विधानपरिषद
## पत्रक भाग दोन
## गुरूवार, दिनांक २३ फेब्रुवारी, २०२३/ फाल्गुन, ४ १९४४ (शके)
**(संदर्भ : पत्रक भाग दोन क्रमांक ७/७, सोमवार, दिनांक २४ जानेवारी, २०२२)**

८. :: **म.वि.प.नियम २५९ अन्वये "अंतिम आठवडा प्रस्ताव"** आणि **सत्ताधारी व विरोधी पक्षाकडून देण्यात येणारा सार्वजनिक हितासंबंधीचा म.वि.प.नियम २६० अन्वये प्रस्ताव स्वीकारण्याबाबत ::**

१. महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०२३ च्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात म.वि.प.नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा व म.वि.प.नियम २६० अन्वये सार्वजनिक हितासंबंधाच्या बाबींवर चर्चा करण्याबाबतचे प्रस्ताव **DMOIS** या आज्ञावली **(WEB PORTAL)** व्दारे **ऑनलाईन पद्धतीने** स्वीकारण्यात येतील. तसेच ज्या दिवशी प्रस्ताव चर्चेसाठी घेण्यात येणार आहे, त्याच्या आदल्या कामकाजाच्या दिवशी तो प्रस्ताव **ऑनलाईन पद्धतीने सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** स्वीकारण्यात येईल. त्याचप्रमाणे सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालयात ऑफलाईन पद्धतीने देखील स्वीकारण्यात येईल.

२. म.वि.प.नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा व म.वि.प.नियम २६० अन्वये सार्वजनिक हितसंबंधाच्या बाबींवर ऑफलाईन पद्धतीने प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांमध्ये एका पेक्षा जास्त सदस्य असल्यास त्या सदस्यांच्या स्वाक्षरीच्या खाली सन्माननीय सदस्यांनी आपले नाव व नावांचा क्रम स्पष्टपणे नमूद करावा.

३. म.वि.प.नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा व म.वि.प.नियम २६० अन्वये देण्यात येणाऱ्या प्रस्तावांमध्ये केवळ चार-पाच विभागांशी संबंधित विषय समाविष्ट असावेत.

४. म.वि.प.नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा व म.वि.प.नियम २६० अन्वये प्राप्त होणाऱ्या प्रस्तावाच्या सूचना स्वीकृती संबंधी व स्वीकृत प्रस्ताव चर्चेला घेण्यासंबंधीचा संपूर्ण अधिकार मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचा राहिल.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २३ फेब्रुवारी, २०२३

**राजेन्द्र भागवत**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद

**प्रती :-**

१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य
२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
३) मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
४) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे स्वीय सहायक
५) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष
६) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये
७) संगणक कक्ष (संकेतस्थळ)
८) एम.के.सी.एल.(आज्ञावली)